# मी कोण आहे?: बंटींग डिझाइन करा



Image by macrovector on Freepik

## बंटींग म्हणजे काय?

बंटींग म्हणजे विभिन्न रंगाच्या पताकांनी बनवलेले तोरण ज्याचा उपयोग सजावटीसाठी केला जातो. बनटींग हे कागदी, कापडी, प्लास्टिकचे, पानांचे इ. अश्या अनेक प्रकारांचे असतात. ह्यांचा उपयोग आजकाल सणासुदीला, उत्सवात, प्रचारात, जागृतीक कार्यक्रमात व लोकांचे विचार व्यक्त करण्यासाठी केला जातो.

शिक्षण क्षेत्रात बंटींगचा उपयोग शैक्षणिक साधन म्हणून संकल्पना शिकवण्यासाठी किंवा कलाकृती बनवण्यासाठी केला जातो. उदाहरणार्थ, विद्यार्थी डिझाइन आणि तंत्रज्ञान विषयावर असणाऱ्या पाठ्य योजनांच्या माध्यमातून बंटींग बनविण्यास शिकतात आणि शिलाई व विणकामचा सराव करतात (खालील दिलेल्या संदर्भांच्या सूचित हिलस्टोन शाळेने विकसित केलेली पाठ्य योजना पहावी).

# मी कोण आहे?: बंटींग डिझाइन करा

## बंटींग बनवा जो तुमची ओळख दर्शवतो !

एक बंटींग डिझाइन करा ज्यात ५ घटकांचा समावेश असला पाहिजे. प्रत्येक घटक खालील दिलेल्या प्रेरकांमधून एकाशी संबंधित असला पाहिजे. घटक दर्शवण्यासाठी तुम्ही खालील दिलेल्या कुठल्याही एका अभिकल्पिक विकल्पाचा उपयोग करू शकता.

**प्रेरक:–**

अ. मला आवडणारी गोष्ट.

आ. मला न आवडणारी गोष्ट.

इ. तुमच्याबद्दल अशी गोष्ट जी तुम्हाला तुमच्या युवावस्थेत बघायला आवडेल.

ई. जर गिनीजच्या विश्वविक्रमाच्या यादीत तुमच्या नावाची नोंदणी झाली, तर ती कश्यासाठी असेल?

उ. तुमच्याबद्दल एखादी गोष्ट.

**अभिकल्पिक विकल्प:–**

१. शब्दांचा उपयोग.

२. चित्र काढणे.

३. कागदाचा उपयोग:– कागदची घडी घालून तुम्ही त्याचे रूप बदलू शकता, त्याचा गोळा बनवू शकता, गुंडाळी करूशकता,परंतु कागदाला कापू किंवा फाडू शकत नाही.

४. कागदला कापणे किंवा फाडणे.

५. घरातल्या कुठल्याही एका सामग्रीचा उपयोग

## लक्षात ठेवा!

1. तुमचे बंटींग तुम्हाला किंवा तुमच्या व्यक्तिमत्वाला दर्शवणारे असले पाहिजे.
2. तुमच्या बंटींगचे पाचही घटक एका दोरीवर मावले पाहिजेत.
3. सर्व अभिकल्पिक विकल्पांचा कमीतकमी एकदा तरी प्रयोग झालाच पाहिजे.

उदाहरणार्थ: प्रेरकांमधील पॉईंट (ई) बद्दल दर्शवण्यासाठी तुम्ही अभिकल्पिक विकल्प क्रमांक (२) चा व पॉईंट (उ) बद्दल दर्शवण्यासाठी अभिकल्पिक विकल्प क्रमांक (४) चा उपयोग करू शकता.

4. बंटींगचे घटक तुम्ही दोरीवर आडवे किंवा उभे मांडू शकता.
5. बंटींगचे घटक तुम्ही कुठल्याही अनुक्रमात मांडू शकता.

# मी कोण आहे?: बंटींग डिझाइन करा

## पार्श्वभूमी

बंटींग तयार करणे ही एक अशी हस्तकला आहे ज्यात मुलांना पताका बनवण्याचे प्रशिक्षण मिळते. ह्या हस्तकलेमुळे मुलांना एक सौंदर्यात्मक व सर्जनशील वस्तु बनवण्याची संधी मिळते. हस्तकला माणसाच्या सर्जनशीलतेवर, योजना आखण्याच्या क्षमतेवर, अभिकल्पकतेवर, कलाकृतीच्या मूल्यांकावर व ते निर्माण करण्याच्या पद्धतीवर नियंत्रण आणण्यास मदत करते. ह्या मुळे माणसाला आपले विचार आणि त्याची क्षमता व्यक्त करण्याची संधी मिळते (Ihatsu, 2002). हस्तकला सहयोग कौशल्य, सांस्कृतीक ओळख व स्वतः शिकण्याच्या कौशल्याला प्रोत्साहन देण्या व्यतिरीक्त ते बनविणाऱ्याचे विचार, दृश्य कला आत्मसात करण्याची समज, त्याचे अनुभव, गंभीरपणे विचार करण्याची क्षमता सुद्धा दर्शवते (Mayer, 2022; Pöllänen, 2009; Mirante, 2021). अभिकल्पिक विकल्पांच्या मर्यादांमुळे, हे कार्य मुलांना समस्येला सर्जनशीलपणे सोडवण्यात गुंतवते. ह्या कार्यात, विद्यार्थांना स्वतःचे चित्रण करण्यासाठी, विचारमंथन करताना कागदाचा उपयोग करण्याचे नियम पाळणे गरजेचे आहे.

ही कृती अनिशा मल्होत्रा–दलवी यांनी बालदिन 2021 च्या निमित्ताने आयोजित विशेष कार्यशाळेचा एक भाग म्हणून विकसित केली होती.

## References:

Hillstone School Lesson Plan (nd). https://www.hillstone.org.uk/wp-content/uploads/2022/06/Y2-Beautiful-Bunting.pdf

Ihatsu, A.-M. (2002). *Making Sense of Contemporary American Craft* (Joensuun yliopiston kasvatustieteellisiä julkaisuja, No. 73). Joensuu, Finland: University of Joensuu.

Mayer, F.(2022). Developing Children's Creativity Through the Art of Crafts. *Proceedings of the 6th International Conference of Early Childhood Education (ICECE-6 2021)*, Atlantis press, 30-33. https://doi.org/10.2991/assehr.k.220602.007

Pöllänen, S. (2011). Beyond craft and art: A pedagogical model for craft as self-expression. *International Journal of Education through Art, 7*(3), 111–125.

Mirante, S. (2021). Craft in Art Education: *The Learning Outcomes and Benefits of Working with Craft Materials and Methods.* (Publication No. 28498702) [Doctoral Dissertation, Pratt Institute]. Pratt Institute ProQuest Dissertation & Thesis.